# विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळ (VUM)
## सत्र 2019-20
## अहवाल

सत्र 2019-20 मध्ये विद्यार्थिनी 'उत्कर्ष मंडळाची' प्रभारी प्राध्यापक म्हणून जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली होती. VUM च्या माध्यमातून नियोजित विविध कार्यक्रम आणि स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्या व्यतिरिक्त Orientation Program वर्ग 12 वी च्या आणि B.A. I^st विद्यार्थिनींसाठी घेण्यात आला. शिक्षक दिनाचा कार्यक्रम नाविन्यपूर्ण पद्धतीने सादर करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमांच्या आयोजनात विद्यार्थिनींचा सहभाग वाढावा, त्यांना सभाधीटपणा यावा, त्यांच्या नवीन कल्पनांना मूर्त रूप यावे याकडे विशेष लक्ष देण्यात आले.

या वर्षीच्या प्रथम सत्रातील कार्यक्रमाची सुरुवात 'जागतिक योग दिना'नी झाली.

16 जुलै 2019 रोजी महाविद्यालयाचा वर्धापन दिन आणि 'दीपकळी' प्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. मंजुश्री सरदेशपांडे तसेच उपाध्यक्ष श्री रमेश खानझोडे उपस्थित होते.

VUM च्या माध्यमातून विविध महाविद्यालयांमध्ये आयोजित आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये याही वर्षी विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला असून बहुतांश स्पर्धांमध्ये महाविद्यालयाला घवघवीत यश प्राप्त झाले आहे.

महात्मा गांधी यांच्या 150 व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'गांधी विचार संस्कार' परीक्षेत एकूण 33 विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. B.A. प्रथम वर्षाची दिव्या निखारे हिला जिल्हास्तरीय प्रथम पारितोषिक सुवर्णपदक प्राप्त झाले तर वर्ग 12 वी ची विद्यार्थिनी वहिदा बेगमने रौप्यपदक पटकाविले. सक्रिय सहभागासाठी महाविद्यालयाला सन्मानचिन्ह मिळाले.

याशिवाय कु. निकीता कापरकर, भार्गवी बावरेकर, राधा देशकर, कल्याणी पिसाळ, सिमरन डोंडके, नंदिनी खोटे, जान्हवी झाडे, दिशा हटवार, डॉली कळमकर, आफ्रिन शेख, सानिया अहमद, समृद्धी शेंडे, रोशनी शाहू, पल्लवी मुद्दलियार, प्रगती शर्मा, निर्मिती देवलसी, नेहा श्रीखंडकर, गायत्री नागोसे या विद्यार्थिनींनी पोस्टर स्पर्धा, काव्यवाचन, कथाकथन,

निबंध, मेहंदी, पोस्टर कम स्लोगन, प्रश्नमंजुषा, सामान्य ज्ञान स्पर्धा, गीतगायन, समूहगीत यासारख्या विविध स्पर्धांमध्ये सन्मान स्थान प्राप्त करून महाविद्यालयाची मान उंचावली आहे.

डी.डी. नगर विद्यालयात आयोजित सामान्यज्ञान स्पर्धेमध्ये एकूण 44 विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला वर्ग 12 वी ची स्वाती नेवारे हिला तृतीय क्रमांक आणि महाविद्यालयाला सक्रिय सहभागासाठी स्मृतीचिन्ह मिळाले.

महाराष्ट्र शासन संलग्नित 'युवाजागर' आंतर-महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा - गट क्रमांक 1 या स्पर्धेचे यशस्वी आयोजन पर्यवेक्षक श्री. वैद्य सर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. यात विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील 42 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

RDM महाविद्यालयात आयोजित आंतरमहाविद्यालयीन गरबा नृत्य स्पर्धेत महाविद्यालयातील 10 विद्यार्थिनींची चमू सहभागी झाली होती.

दि. 05-10-2019 रोजी नागपूर महानगर पालिकेच्या विद्यमाने 'Town Hall' मध्ये आयोजित 'मतदान जागृती अभियानां'मध्ये महाविद्यालयातील एकूण 110 विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे आयोजित 'संस्कृत ग्रंथदिंडी'मध्ये एकूण 55 विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून महाविद्यालयाला सन्मानचिन्ह प्राप्त करून दिले.

विमल पत्तरकिने सुगमसंगीत स्पर्धेत कु. भार्गवी बावरेकर ने प्रथम क्रमांक आणि फिरती वैजयंती पटकावली तर सिमरन दोडके द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली.

आंतरमहाविद्यालयीन सुंदर वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आणि फिरती वैजयंती इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या महाविद्यालयाला मिळाली.

आंतरमहाविद्यालयीन 'रामचंद्र - जानकी नागदेव गझल' स्पर्धेत कु. भार्गवी बावरेकर हिने द्वितीय क्रमांक पटकावला तर वा. मी. दामले नाट्याभिनय स्पर्धेत कु. कल्याणी पिसाळ हिने वैयक्तिक प्रथम क्रमांक व कु. जयंती जोशी सह फिरती वैजयंती प्राप्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी डॉ. प्रदीप

* ॲड. राजेंद्र राठी आंतर-महाविद्यालयीन निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आणि फिरती वैजयंती राधा मुकुंद देशकर या विद्यार्थिनीने पटकाविली तर द्वितीय क्रमांक गीता सकळदीप रविदास हिने मिळविला आगलावे होते. 3

दि. 13-1-2020 रोजी स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्रीमती गौरी खेर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

दि. 31 जानेवारी 2020 रोजी तत्वज्ञान विभागाचे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. संजय वैद्य यांच्या सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभाचे आयोजन केले होते.

महाविद्यालय आणि विश्व मांगल्य छात्र सभा यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रमुख अतिथी शिवाली देशपांडे यांनी विद्यार्थिनींना अमूल्य मार्गदर्शन केले.

दि. 16-1-2020 रोजी 'विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळाचे' उद्घाटन समारंभ पार पडला. प्रमुख अतिथी श्रीमती ज्योत्स्ना पंडित यांनी विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले. VUM-ची अध्यक्ष प्रिया कुकवास आणि इतर सभासदांची तसेच स्नेहसंमेलन समितीची सचिव काजल पाल व इतर सभासदांच्या निवडीची घोषणा करण्यात आली. महाविद्यालयाच्या कार्याप्रती प्राचार्या डॉ. गजभिये यांनी शपथ दिली.

इतिहास विभागाच्या प्रा. डॉ. अंजू शरण यांनी नागपूर विद्यापीठाची आचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल दि. 15-2-2020 रोजी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. * Covid-19 विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण देशभर लॉकडाउन घोषित केल्यामुळे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. लता गजभिये यांच्या सेवा-निमित्त 31 मार्च 2020 रोजी डिजिटल निरोप समारंभ घेण्यात आला. यात सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळाची जबाबदारी पूर्ण करताना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. लता गजभिये मॅडम यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. उपप्राचार्य डॉ. मराठे मॅडम, माजी पर्यवेक्षक प्रा. वैद्य सर, पर्यवेक्षिका प्रा. आरती बरगे यांचे सतत सहकार्य मिळाले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

डॉ. कोंगरे, डॉ. सोमलवार, डॉ. गजभाटे, प्रा. राजंदेकर, प्रा. गोविंद मॅडम यांचे विशेष सहकार्य मिळाले त्याबद्दल मी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करते. माझ्या सहयोगी प्रा. हेडाऊ मॅडम यांचीही मोलाची मदत झाली त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. डॉ. शंभरकर सर यांचे ही विशेष आभार मानते. संगीत विभाग आणि प्रा. पाटील मॅडम यांची विशेष मदत

कार्यक्रम घेतांना सर्वच प्राध्यापकांची प्रत्यक्ष , अप्रत्यक्ष मदत मिळाली त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करते.
शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. वैरागडे , श्री. घोन्चोरघडे श्री. चव्हाण , श्री. संदीप डोंगरे , श्री. संदीप गवई , श्री. परळे श्री. शेखर लिंगे यांचे वेळोवेळी सतत सहकार्य मिळाले त्याबद्दल त्यांचे आभार मानते. रागिनी मॅडम , निकिता टिंगणे यांचीही मोलाची मदत मिळाली त्यांची मी ऋणी आहे.
प्रत्यक्ष , अप्रत्यक्ष ज्यांची ज्यांचे सहकार्य मिळाले त्या सर्वांचे पुनश्च आभार मानते.

धन्यवाद !

मागील वर्षीचा खर्च - 6364 रु
यावर्षीचा एकूण खर्च - 5344 रु
(2019-20)

Slade
प्रा. एस. आर. लाडे
प्रभारी प्राध्यापक
VVM - 2019-20

ॲडव्हान्स प्राप्त 6500 रु
झालेला खर्च 5344 रु
कार्यालयामध्ये वापस
करणे एकूण 1156 रु